Exh. 17



रे.क.न. ११/२०२६

मे. दिवाणी न्यायाधिशसो क. स्तर राधानगरी

यांचे कोर्टात........

Order-
Read and recorded.
Sd/-
Jt. C.J.J.D.,Radhanagari.
Dt. 10-03-2026

प्रविण नामदेव ढवण वगैरे ......... वादी

विरूध्द

प्रल्हाद बाबुराव ढवण वगैरे ........... प्रतिवादी

<u>यातील प्रतिवादी नं. ४ यांची वादीच्या मुळ दाव्यास कैफियत व नि. ५ च्या तुर्तातुल मनाई अर्जास लेखी म्हणने खालीलप्रमाणे:—</u>

१. यातील वादीचा दावा व मनाई अर्ज पुर्णत: खोटा लबाडीचा व खोडसाळपणाचा असून प्रतिवादी यांना कोणत्याही प्रकारे मान्य व कबुल नाही. वादीचे दावा व मनाई अर्जातील संपुर्ण कथनांचा प्रतिवादी स्पष्टपणे इन्कार करीत आहेत.

२. वादी यांनी ज्या स्वरुपात दावा व मनाई अर्ज दाखल केलेला आहे त्या स्वरुपात दावा व मनाई अर्ज चालणेस पात्र नाही.

३. वादींनी प्रस्तुतच्या खोटया दावेची व मनाई अर्जाची रचना करुन प्रतिवादीला नाहक त्रास दिला आहे व खर्चाचे पेची आणलेले आहे त्यामुळे वादी यांनी प्रतिवादी यांनी प्रत्येकी रक्कम रुपये २५,०००/— नुकसान भरपाई देणेबाबत आदेश व्हावा.

४. यातील वादी यांनी खोटी व बनावट कागदपत्रे तयार करुन तसेच वादींना ज्ञात असलेल्या बऱ्याच गोष्टी मे. कोर्टापासुन लपवून ठेवुन प्रस्तुतच्या खोटया दावेची व मनाई अर्जाची रचना केलेली असल्यामुळे वादीच्या दावा व मनाई अर्जास सप्रेशन ऑफ मटेरियल फॅक्टस् या तत्वाची बाधा येते त्यामुळे वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा.

Assistant Suprintendent

५. वादीच्या दावा व मनाई अर्जास तुकडे जोड तुकडे बंदी कायदा १९४७ च कलम ३६ अ मधील तरतुदीची स्पष्ट बाधा येते. तसेच सदर कायदयातील इतर तरतुदीनुसार देखील वादीचा दावा व मनाई अर्ज कायदयाने चालणेस पात्र नाही. एकीकडे वादी दावा मिळकतीबाबत एकत्रिकरण अधिकारी यांची एकत्रिकरणावेळी चुकी झाली आहे असे म्हणतात व सदर योजनेबाबत संबंधीत कायदयाप्रमाणे कार्यवाही करत नाहीत. यावरून देखील वादी हे स्वच्छ हाताने मे. कोर्टात आले नसलेचे स्पष्ट होत आहे.

६. दावा अर्ज कलम १ व मनाई अर्ज कलम १ मधील दावा मिळकतीचे वर्णन संपुर्णपणे खोटे, लबाडीचे खोडसाळपणाचे असुन दावा मिळकतीचे वर्णनावरुन दावा मिळकतचा कोणतेही प्रकारे बोध होत नाही. वादी यांनी दावा मिळकतीच्या नमुद केलेल्या चर्तुसिमा कशाच्या आधारे नमुद केल्या आहेत. याबाबत वादी स्पष्टीकरण देत नाहीत. प्रतिवादी नं. ४ यांची गट नं. ५०४ ची मिळकत या मिळकतीशी वादी यांचा काहीही संबंध नसताना वादी यांनी सदर मिळकत दावा मध्ये समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे वादीच्या दावा व मनाई अर्जास सी. पी. सी. ऑ ७ रुल ३ मध्ये स्पष्ट व बंधनकारक तरतुदींची बाधा येते त्यामुळे देखील वादीचा दावा व मनाई अर्ज फेटाळणेस पात्र आहे.

७. दावा अर्ज कलम २ व मनाई अर्ज कलम २ मधील वंशावळ सर्वसाधारण बरोबर आहे.

८. दावा अर्ज कलम ३ व मनाई अर्ज कलम ३ मधील मजकुर सर्वसाधारण बरोबर आहे.

९. दावा अर्ज कलम ४ व मनाई अर्ज कलम ४ मधील मजकुर सर्वसाधारण बरोबर आहे.

Assistant Suprintendent

१०. दावा अर्ज कलम ५ व मनाई अर्ज कलम ५ मधील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा असून प्रस्तुत प्रतिवादी यांनी तो कोणत्याही प्रकारे मान्य व कबुल नाही. वादीनी नमुद केले प्रमाणे एकत्रिकरणामध्ये कधीही अदला बदल झालेली नव्हती व नाही. गट नं. ५०४ ची मिळकत एकत्रिकरण योजने पुर्वीपासून म्हणजे १९६० पुर्वीपासुन ते आजतागायत प्रतिवादी नं. ४ व त्यांचे पुर्वहक्कदार यांचेच प्रत्येक्ष कब्जेवहिवाटत असून तशा नोंदी ज्या त्या साली महसुली अधिकारी यांचेवतीने महसुल दप्तरी झालेल्या आहेत. गट नं. ५०४ च्या गटाचे व सर्व्हे रेकॉर्डला झालेल्या कब्जेदार सदरीच्या व पिक पाहणीच्या तसेच एकत्रिकरण कालवधीतील नोंदी या योग्य व बरोबर असुन अंतिम होत्या व आहेत. सदर नोंदी बाबत यातील वादी अगर त्यांचे पुर्वहक्कदार यांनी सक्षम न्यायालयात आजतागायत दाद मागीतलेली नाही. वादी अगर त्यांचे पुर्वहक्कदार यांची दावा मिळकतीसह दावा मिळकत गट नं. ५०४ मध्ये कधीही प्रत्यक्ष कब्जेवहिवाट नव्हती व नाही. वादीनी नमुद केले प्रमाणे एकत्रिकरण अधिकारी यांचेकडे प्रतिवादीचे पुर्वहक्कदार यांनी कधीही व कसल्याही प्रकारचे जबाब दिलेले नव्हते व नाही. त्यामुळे गट नं. ५०४ ला वादीचे पुर्वहक्कदार यांचे नाव नमुद होणे आवश्यक होते हे वादीचे कथन खोटे व चुकीचे आहे. दावा मिळकतीबाबतचे एकत्रिकरण योजनेमध्ये तत्कालीन चौकशी अधिकारी यांचेकडून काहीही चुक झालेली नाही. तसेच एकत्रिकरण अधिकारी यांचेसमोर जबाब दिले नंतर त्याच दिवशी जमिनीची आदला बदल झालेली आहे व मुंबई तुकडे बंदी तुकडे जोड कायदयातील कलम २४ नुसार त्याच दिवशी वादीचे पुर्वहक्कदार हे गट नं. ५०२, ५०३ व ५०४ या मिळकतीचे मालक झालेले आहेत हे वादीचे कथन पुर्णत: खोटे व लबाडीचे

Assistant Suprintendent

आहे. वादीचे पुर्वहक्कदार यांचा दावा मिळकतीशी काहीही संबंध नसलेने त्यांचे मृत्यु नंतर वादीनी दावा मिळकतीमध्ये मालकी हक्क प्रप्त झालेले असुन त्याप्रमाणे त्यांची वहिवाट सन १९६६ पासुन आजतागायत अव्याहतपणे आहेत हे वादीचे कथन पुर्णत: चुकीचे व लबाडीचे आहे. सदर कलमातील वादीच्या कथनानुसार दावा मिळकती बाबतच्या नोंदीबाबत वादी व त्यांचे पुर्वहक्कदार यांना १९७६ व १९८० सालीच माहीती असलेचे दिसुन येत आहे. सदर प्रमाणे वादी यांचे कथनाप्रमाणे गावकामगार तलाठी यांचे निर्देशानुसार वादी व त्यांचे पुर्वहक्कदार यांनी मुदतीमध्ये तुकडे बंदी कायदयातील सक्षम न्यायाधिकरणाकडे एकत्रिकरण योजना आव्हानीत करणे गरजेचे होत. सदर कार्यवाही वादी व त्यांचे पुर्वहक्कदार यांचे कडून मुदतीत झालेली नसलेने एकत्रिकरण योजना आव्हानीत करणेचा वादी व त्यांचे पुर्वहक्कदार यांचा हक्क व अधिकार कायदयाने निघुन गेला असलेने व त्यामुळे वादी यांना एकत्रिकरण योजना आव्हानीत करणे शक्य नसलेने वादी यांनी कोर्ट प्रक्रीयेचा गैरफायदा घेवून प्रतिवादीना त्रास देणे व त्या अनुषगांने दावा मिळकतीमध्ये दांडगाव्याने कब्जा करणे या उदेशान प्रस्तुतचा दावा व मनाई अर्ज दाखल केलेला आहे. एकत्रिकरण योजना कायदा कलम २४ प्रमाणे प्रमाणपत्र दावा मिळकतीबाबत दिलेचा कोणताही पुरावा व सदर प्रमाणपत्र वादी व त्यांचे पुर्वहक्कदार यांनी नोंदणी केलेचा पुरावा वादी यांचेकडे नाही. त्यामुळे सदर कलमा प्रमाणे वादी हे दावा मिळकतीचे मालक झाले आहेत हे वादीचे कथन खोटे आहे. तसेच एकत्रिकरण कायदयातील तरतुदीप्रमाणे मालकी हक्क ठरविणेचा अधिकार दिवाणी कोर्टास नाही. त्यामुळे वादीचा दावा व मनाई अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे.

Assistant Suprintendent

११. दावा अर्ज कलम ६ व मनाई अर्ज कलम ६ मधील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा प्रस्तुत प्रतिवादी यांनी तो कोणत्याही प्रकारे मान्य व कबुल नाही. सदर कलमात नमुद केलेप्रमाणे वादी यांनी पोलिसांकडे दाखल केलेल्या कोणत्याही तक्रारींची माहीती प्रतिवादी नं. ४ यांना नव्हती व नाही. त्यामुळे सदर वादीच्या तथाकथित ता. ३०.१२.२०२५ इ रोजी पासुन प्रतिवादी यांनी वादीनां दावा मिळकतीबाबत हरकत अडथळा करणेचा प्रश्न येत नाही. वादीच्या सदर कलमातील कथनावरून प्रतिवादी न. ४ यांचबाबत व प्रतिवादी नं. ४ यांच्या मालकीच्या गट नं. ५०४ बाबत दाव्यास कारणच घडलेले नसलेचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. ४ व प्रतिवादी नं. ४ यांची मालकी व कब्जेवहिवाटीची गट नं. ५०४ बाबत वादी यांचे दावेस व मनाई कर्जास कारणच घडले नसलेचे स्पष्ट होत आहे.

१२. वादींना तथाकथित दावा मिळकतीवरुन प्रस्तुतचा दावा दाखल करणेचा हक्क व अधिकार नव्हता व नाही त्यामुळे देखील वादीचा प्रस्तुतचा दावा व मनाई अर्ज चालणेस पात्र नाही. दावा मिळकतीमध्ये वादी यांची कधीही कब्जेवहीवाट नव्हती व नाही. दावा मिळकत वादी अगर इतर कोणाच्याही कब्जेत प्रतिवादी यांनी कधीही दिलेली नव्हती व नाही.

१३. मनाई अर्ज कलम ७ मधील मनाईची कारणे खोटी व लबाडीची आहेत.

१४. दावा अर्ज कलम ७ मधील नमुद दावेस कारण खोटे व लबाडीचे आहे. दाव्यास कधीही कारण घडलेले नाही. जे घडलेले आहे असे नमुद केलेले आहे ते चुकीचे आहे.

Assistant Suprintendent

१५. दावा अर्ज कलम ८ व ९ मधील दावेचा तपशिल व आकारणी चुकीची आहे.

१६. दावा अर्ज कलम १० ते १२ मधील मजकुर चुकीचा आहे. वादीचा दावा मुदतीत नाही.

१७. दावा अर्ज कलम १३ व मनाई अर्ज कलम ८ मधील कोणतीही दाद मिळणेस वादी पात्र नाहीत.

१८. सकृत दर्शनी केस वादीचे बाजुनी नसुन प्रतिवादी चे बाजुने आहे.

१९. न्यायाचा तराजु प्रतिवादीचे बाजुने झुकतो आहे.

२०. वादीचा दावा व मनाई अर्ज मंजुर झालेस प्रतिवादीचे कधीही व कशानेही भरुन न येणारे अपरिमीत नुकसान होणार आहे.

२१. वादी हे स्वच्छ हाताने मे. कोर्टात आलेले नाहीत. त्यामुळे वादी मनाईसारखी ईक्वीटेबल रिलीफ मिळणेस कायदयाने पात्र नाहीत. त्यामुळे देखील वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह फेटाळणेस पात्र आहे.

२२. वादींना दावा मिळकतीबाबत दावा दाखल करणेचाच हक्क व अधिकार नाही. दावा मिळकतीबाबत कोणतीही दाद वादींना कायद्याने मागता येणार नाही. तसेच वादी दावेमध्ये परस्पर विरोधी कथने व दादी मागत आहेत. त्यामुळेही वादीचा दावा नामंजुर होणेस पात्र आहे.

२३. वादी हे दावा मिळकतीबाबत मालकी हक्क ठरवुन मागत आहेत. सदरचा वादीचा तथाकथित मालकी हक्क शाबित झाले शिवाय व सदरचा हक्क मे. कोर्टाने अंतिमरित्या निश्चित केले शिवाय वादीचा दावा मिळकतीशी काहीही संबंध असलेचे गृहितक निघत नाही कारण दावा मिळकतीचे कागदोपत्री वादी चा

Assistant Suprintendent

सध्यस्थितीमध्ये व प्रत्यक्षातही काहीही संबंध दिसुन येत नाही. त्यामुळे वादीची मालकी शाबित झाले शिवाय वादी कायदयाने मनाई मिळणेस पात्र नाहीत. दावा मिळकतीस प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार यांचे व त्यानंतर प्रतिवादी यांचे नाव वारसा फेरफाराने मालक म्हणून नोंद झालेले आहे. त्यामुळे दावा मिळकतीशी वादीचा काहीही संबंध नाही.

२४. <u>सबब वादी यांची विनंती की,</u>

अ) वादीचा दावा व नि. ५ चा मनाईचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

ब) वादी यांनी प्रतिवादी यांना प्रत्येकी २५,०००/— रू. नुकसान भरपाई देणेबाबत वादी विरूध्द आदेश व्हावा.

क) प्रतिवादीचा कोर्टखर्च वादीकडून वसूल होवून मिळावा.

ड) जरूरतर कैफियत दुरूस्तीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे असे.

राधानगरी

ता. १०.३.२०२६

**प्रतिज्ञा**

यातील मी प्रतिवादी नं. ४ सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील कैफियतमधील सर्व मजकूर आमचे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी

ता. १०.३.२०२६

**ॲफिडेव्हीट**

मी यातील प्रतिवादी नं. ४ आनंदा दत्तात्रय ढवण व.व. ६७, धंदा: शेती, रा. मांगेवाडी ता. राधानगरी, जि.कोल्हापूर देवाची शपथ घेऊन ॲफिडेव्हीट करतो की, वरील कैफियतमधील सर्व मजकूर माझे

Assistant Suprintendent

माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे व सदर नक्कला मला माझे माहीती करीता आवश्यक आहेत सदर नक्कलांचा मी कसलाही गैरवापर करणर नाही म्हणून ॲफिडेव्हीट असे.

राधानगरी

ता. १०.३.२०२६

मी ॲफिडेव्हीट करणार यांना ओळखतो

**(ॲड. आर. डी. खाडे )**

**प्रतिज्ञा**

मी यातील प्रतिवादी नं. ४ आनंदा दत्तात्रय ढवण व.व. ६७, धंदा: शेती, रा. मांगेवाडी ता. राधानगरी, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील कैफियत व ॲफिडेव्हिटमधील सर्व मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा असे.

राधानगरी

(आनंदा दत्तात्रय ढवण)

ता. १०.३.२०२६

Solemnly Affirmed before me by Ananda Dattatray Dhavan.
Shri./Smt. Ananda Dattatray Dhavan
Age 67 Occu. Agri.
Of Mangewadi, Tal. Radhanagari
Who identified by Shri./Smt. R.D. Khade.
Adv. Whom I Know personally
Dated 10/3/2026

Assistant Superintendent